नि. दि. दावा क्र.११३/२०१२
मंगलबाई वि. तुकाराम व इतर
CNR No.MHJN090003612012

निशाणी क्रमांक ६६ वरील आदेश

१) वादीने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश–६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी दिला आहे.

२) वादीने कथन केले की, वादी क्र.१ ही वादी क्र.२ सह माहेरी राहते. त्यामुळे, त्यांना दाव्यातील जमिनीची वेळीच पूर्ण माहिती व कागदपत्रे मिळाली नाही. त्यामुळे, त्यांना दाव्यात आवश्यक ती माहिती नमूद करता आली नाही. दाव्यातील काही जमिनीचे क्षेत्र टंकलिखीत करताना चुकीचे टंकलिखीत केले आहे. दाव्यातील काही जमिनी प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.२ यांची मुले बालाजी व शिवाजी यांच्या नावे परस्पर फेर करुन केली आहे. त्यामुळे, बालाजी व शिवाजी यांना सदर दाव्यामध्ये पक्षकार म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे मयत झाले असून त्यांच्या नावापुढे मयत हा शब्द लिहिणे आहे.

३) वादीने दाव्याच्या पान क्र.२ वर परिच्छेदामध्ये ओळ क्र.३ मधील मजकूर ''नं.५८ क्षेत्र ० हेकटर ७१ आर'' असे नमूद केले आहे. त्याऐवजी ''नं.५८ क्षेत्र १ हेक्टर ८९ आर'' व गट नं.२६६ या शब्दापुढे ''० हेक्टर १० आर'' ऐवजी ''० हेक्टर ८० आर'' दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

४) दाव्यातील पान क्र.३ वर परिच्छेद क्र.१ मधील ओळ क्र.४ मधील ''७१ आर आणि १० आर'' ऐवजी ''१ हेक्टर ८९ आर आणि ८० आर'' व ओळ क्र.६

मधील मालमत्ता आहे या शब्दानंतर वादी व वादी क्र.१ चे पतीचे पाठीमाघारी कोणतीही संमती न घेता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी संगनमताने बेकायदेशीरपणे प्रतिवादी क्र.८ व ९ यांच्या नावाने फेर घेऊन त्यांची गट क्र.२६६ व गट क्र.५८ च्या सातबारा उताऱ्यामध्ये नोंद केली. सदर नोंद ही पाठीमाघारी व संमतीविना झालेली असल्याने ती बेकायदेशीर असल्यामुळे सदर नोंद ही व फेर वादीवर बंधनकारक नाही. तसेच, ते बोगस व बनावट आहे, असा मजकूर नमूद करण्याची परवानगी मागितली आहे.

५) दाव्याच्या पान क्र.३ वर परिच्छेद क्र.२ मधील ओळ क्र.५ मधील सासरी राहतात या शब्दानंतर प्रतिवादी क्र.८ व ९ ही प्रतिवादी क्र.२ ची मुले आहेत, असा मजकूर नमूद करण्याची परवानगी मागितली आहे. दाव्याचे पान क्र.६ वर विनंती की या परिच्छेदामधील ओळ क्र.३ मधील गट क्र.५८ क्षेत्र ''० हेक्टर ७१ आर'' या ऐवजी ''गट क्र.५८ क्षेत्र १ हेक्टर ८९ आर '' व या परिच्छेदामधील ओळ क्र.३ व ४ मधील ''गट क्र.२६६ क्षेत्र ० हेक्टर १०'' या ऐवजी ''गट क्र.२६६ क्षेत्र ० हेक्टर ८० आर'' असे दुरुस्त करण्याची परवानगी मागितली आहे.

६) प्रतिवादी यांनी नि.६७ वर म्हणणे दाखल करुन सदर अर्जाला आक्षेप घेतला की, वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० व आदेश ६ नियम १७ या खाली दोन अर्ज करणे आवश्यक होते. वादीच्या माघारी प्रतिवादींनी कुठल्याही प्रकारचे हस्तांतरण केलेले नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती ही बेकायदेशीर आहे. वादीच्या मागण्या मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होईल. त्यामुळे, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

७) वादीने नि.६८ वर लेखी युक्तिवाद दाखल केला. प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री.एस.आर.पडोळ यांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.२ यांची मुले बालाजी सुधाकर जुंबड व शिवाजी सुधाकर जुंबड यांना वादमिळकतीतील काही जमीन परस्पर फेर करुन त्यांच्या नावे केलेली आहे. त्याबाबत वादीने गट क्र.२६६ व ५८ चे सातबारा उतारे दाखल केले आहे. सदर सातबारा उताऱ्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये बालाजी सुधाकर जुंबड व शिवाजी सुधाकर जुंबड यांचे नाव नमूद आहे. त्यामुळे, त्यांना सदर दाव्यामध्ये दुरुस्ती करुन प्रतिवादी करणे हे आवश्यक आहे.

८) वादीने प्रतिवादी क्र.१ ते ३ हे मयत झाल्याचे कथन केले व त्यांच्या नावापुढे मयत असे लिहिण्याची परवानगी मागितली. परंतू, वादीने प्रतिवादी क्र.१ ते ३ मयत झाले याबाबत त्यांचे मृत्युप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे मयत आहेत, याबाबत अभिलेखावर कागदपत्रे आलेले नाही. त्यामुळे, सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य होणार नाही.

९) वादीने दाव्याच्या पान क्र.२ वर परिच्छेदामध्ये ओळ क्र.३ मधील मजकूर ''नं.५८ क्षेत्र ० हेकटर ७१ आर'' असे नमूद केले आहे. त्याऐवजी ''नं.५८ क्षेत्र १ हेक्टर ८९ आर'' व गट नं.२६६ या शब्दापुढे ''० हेक्टर १० आर'' ऐवजी ''० हेक्टर ८० आर'' नमूद करण्याची परवानगी मागितली आहे. सदर चूक ही टंकलिखीत चूक असून ती दुरुस्त करण्यास परवानगी देणे योग्य होईल.

१०) दाव्यातील पान क्र.३ वर परिच्छेद क्र.१ मधील ओळ क्र.४ मधील ''७१

आर आणि १० आर'' ऐवजी ''१ हेक्टर ८९ आर आणि ८० आर'' व ओळ क्र.६ मधील मालमत्ता आहे या शब्दानंतर वादी व वादी क्र.१ चे पतीचे पाठीमाघारी कोणतीही संमती न घेता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी संगनमताने बेकायदेशीरपणे प्रतिवादी क्र.८ व ९ यांच्या नावाने फेर घेऊन त्यांची गट क्र.२६६ व गट क्र.५८ च्या सातबारा उताऱ्यामध्ये नोंद केली. सदर नोंद ही पाठीमाघारी व संमतीविना झालेली असल्याने ती बेकायदेशीर असल्यामुळे सदर नोंद ही व फेर वादीवर बंधनकारक नाही. तसेच, ते बोगस व बनावट आहे, अशी दुरुस्त करण्याची परवानगी मागितली आहे. दाखल सातबारा उताऱ्यावरुन प्रतिवादी क्र.८ व ९ यांची नावे वादजमिनीवर नमूद झाल्याचे दिसून येते.

११) दाव्याच्या पान क्र.३ वर परिच्छेद क्र.२ मधील ओळ क्र.५ मधील सासरी राहतात या शब्दानंतर प्रतिवादी क्र.८ व ९ ही प्रतिवादी क्र.२ ची मुले आहेत, असे नमूद करण्याची परवानगी मागितली आहे. बालाजी सुधाकर जुंबड व शिवाजी सुधाकर जुंबड ही प्रतिवादी क्र.२ ची मुले आहेत व त्यांच्या नावाने फेर झालेले आहेत, असे कथन केलेले आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य होईल.

१२) दाव्याचे पान क्र.६ वर विनंती की या परिच्छेदामधील ओळ क्र.३ मधील गट क्र.५८ क्षेत्र ''० हेक्टर ७१ आर'' या ऐवजी ''गट क्र.५८ क्षेत्र १ हेक्टर ८९ आर '' व या परिच्छेदामधील ओळ क्र.३ व ४ मधील ''गट क्र.२६६ क्षेत्र ० हेक्टर १०'' या ऐवजी ''गट क्र.२६६ क्षेत्र ० हेक्टर ८० आर'' असे दुरुस्त करण्याची परवानगी मागितली आहे. सदर चूक ही टंकलिखीत असल्याने सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य होईल.

१३) दाव्यात नि.क्र.२७ वर मूद्दे कायम करण्यात आले आहेत. परंतू अद्यापपावेतो साक्षीपूरावा सूरु झालेला नाही. प्रस्तावित दुरुस्तीतील तथ्ये ही दावा दाखल झाल्यानंतर घडलेली दिसून येतात. त्यामूळे प्रस्तावित दूरुस्तीने त्याच्या स्वरुपात बदल होत नाही अथवा प्रतिवादींच्या हक्कासही बाधा पोहोचत नाही. याउलट ती नामंजूर केल्यास त्याने वादाचा पूर्णतः निकाल देणे शक्य होणार नाही. या सर्व बाबी विचारात घेता प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल असे माझे मत आहे. या कारणास्तव मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज (नि.क्र.६६) मंजूर करण्यात येतो.

२. वादींना अर्जातील परिच्छेद क्र.२, परिच्छेद क्र.४, परिच्छेद क्र.५, परिच्छेद क्र.६ व परिच्छेद क्र.७ यामध्ये नमूद करण्यात आलेल्या मजकूराप्रमाणे मूळ दाव्यात दूरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादींनी दाव्यात या अर्जातील नमूद दूरुस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करावी.

४. वादींनी दूरुस्त दावा अभिलेखावर दाखल करावा व त्याची प्रत प्रतिवादींना द्यावी.

स्वाक्षरीत/-

दिनांक : ३०.०८.२०१९

(भारत सं. गायकवाड)
सह दिवाणी न्यायाधीश
(क. स्तर)बदनापूर.

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा आहे.

लघुलेखकाचे नाव – वि. अ. ढोणे, लघुलेखक निम्न श्रेणी.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर बदनापूर.

स्वाक्षरीत/–

लघुलेखकाची स्वाक्षरी